## Mahatma Phule Shikshan Sansth’s

# KARMAVEER BHAURAO PATIL COLLEGE, ISLAMPUR

## Department of Political Science

## One Day Workshop on

# “Guidance on NET/SET Exam ”

## अहवाल

अग्रणी महाविद्यालय अंतर्गत राज्यशास्त्र विभागाच्या वतीने दि. 24 डिसेंबर 2025 रोजी पदवी व पदव्युत्तर वर्गासाठी ‘नेट-सेट परीक्षा मार्गदर्शन’ या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमासाठी प्रा. शंतनू कुंभार प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. अंगद पाटील उपस्थित होते.

प्रा. शंतनु कुंभार यांनी नेट-सेट च्या अभ्यासासाठी राज्यशास्त्र विषयात उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक असणारी माहिती विद्यार्थ्यांना देताना पेपर नंबर एक चे स्वरूप सांगताना सर्व अभ्यासक्रमआणि अभ्यास करताना कोणती दक्षता घेतली गेली पाहिजे याविषयी विस्ताराने माहिती दिली. विद्यार्थ्यांनी प्रत्येक घटकाचा कसा अभ्यास करायचा याबद्दल त्यांनी माहिती दिली. यामध्ये पर्यावरण, गणितीय समीकरणे, शैक्षणिक अभियोग्यता, संशोधन अभियोग्यता, पर्यावरण, संदेशवहन, संगणक, माहिती व संदेश, तंत्रज्ञान, उच्च शिक्षण प्रणाली, जनता व पर्यावरण याविषयी परीक्षेला आलेल्या अनेक उदाहरणासह विद्यार्थ्यांना माहिती दिली. यानंतर पेपर नंबर दोन मधील राज्यशास्त्रातील राजकीय सिद्धांत, भारतीय व पाश्चात्य व राजकीय विचारवंत, आंतरराष्ट्रीय राजकारण, भारतीय शासन आणि राजकारण, लोकप्रशासन या विषयांची सखोल माहिती विद्यार्थ्यांना दिली. वरील घटकांचा अभ्यास कसा करावा व त्यासाठी कोणते संदर्भ ग्रंथ उपयोगात आणावेत याविषयी विस्ताराने माहिती दिली. विद्यार्थ्यांनी मूळ संकल्पना समजावून घेऊन ही स्पर्धा परीक्षा देणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन शंतनू कुंभार यांनी केले. यानंतर त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांच्या शंकांचेही निरसन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अंगद पाटील यांनी नेट-सेट परीक्षा अभ्यास करताना आपले अनुभव कथन केले. त्यासाठी अभ्यासातील सातत्य, अभ्यासाचे नियोजन, स्वतःच्या नोट्स काढणे, मूळ संकल्पना समजून घेणे, लिखाणाचा सराव करणे इत्यादी विषयी माहिती दिली. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रा. संदीप पाटील यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा.आश्लेषा पाटील यांनी केले. प्रा. पूनम पाटील यांनी आभार मानले.

HEAD
Department of Political Science
Karmaveer Bhaurao Patil College
Islampur, Tal.Walwa, Dist.Sangli (M.S.)

PRINCIPAL
Karmaveer Bhaurao Patil College
Urun-Islampur, Dist.Sangli. 415 409



‘नेट-सेट परीक्षा मार्गदर्शन’ या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा. शंतनू कुंभार




अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना डॉ. अंगद पाटील